

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटुसत्य

किंमत ९ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ९२ वा | बुधवार, दि. ०४ नोव्हेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: – SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

सत्ताही यांची, मोर्चाही यांचाच, मग जनतेने न्याय मागायचा कुणाकडे ?

सत्तेत बसून मोर्चे काढणाऱ्या भाजप सरकारचा दुटप्पीपणा हास्यास्पद

'लबाड लांडगा ढोंग करतो आणि लोकशाही वाचवण्याचे सोंग घेतो' : खासदार प्रणिती शिंदे

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सत्तेत असताना जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करायचे आणि स्वतःच मोर्चे काढून लोकशाही वाचवण्याच्या घोषणा द्यायच्या, हा भाजप सरकारचा दुटप्पीपणा असून सत्ताही यांची, मोर्चाही यांचाच, मग जनतेने न्याय मागायचा कुणाकडे? असा सवाल खासदार प्रणिती शिंदे यांनी केला. सोलापूर श्रमिक पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

यावेळी भाजप सरकारवर जोरदार टीका करताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, लबाड लांडगा ढोंग करतो आणि लोकशाही वाचवण्याचे सोंग घेतो, अशी भाजप सरकारची अवस्था झाली आहे. सत्तेत बसून मोर्चे काढणे हास्यास्पद आहे. जनतेला मूलभूत सुविधा देण्यात अपयशी ठरलेले सरकार आता संविधान वाचवा, अराजकता हटवा, अशा घोषणा देत आहे. वास्तविक पाहता त्यांच्या बॅनरवर 'आमचं सरकार वाचवा' असा नारा असायला हवा. भाजपच्या या राजकारणाला जनता कंटाळली असून आता जनता त्यांच्या भूलथापांना बळी पडणार नाही.

निवडणुकीपूर्वी सोलापूर शहराला रोज पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन देणाऱ्या सरकारला आज नियोजनाअभावी आठवड्यातून जेमतेम एक दिवस पाणीपुरवठा करता येत आहे. महागाईने उच्चांक गाठला असून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप अपेक्षित मदत मिळालेली नाही. जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्याऐवजी सरकार केवळ घोषणा आणि प्रसिद्धीमध्ये व्यस्त आहे, अशी टीका त्यांनी केली.

राज्यात विकासाच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जात आहेत. 'लाडकी बहीण'सारख्या योजनांवर वर्षाकाठी ४५ हजार कोटी रुपये खर्च केले जात असल्याचा गाजावाजा केला जातो; मात्र दुसरीकडे गोरगरीब रुग्णांच्या आरोग्यसेवांबाबत सरकारची उदासीनता दिसून येत आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ग्रामीण व शहरी भागातील रुग्णांसाठी वरदान ठरलेल्या महा लॅब, मोफत डायलिसिस आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' या महत्त्वाच्या आरोग्यसेवा निधीअभावी संकटात सापडल्या आहेत.

'एचएलएल लाईफ केअर लिमिटेड' या कंपनीची तब्बल १,०६७.२७ कोटी रुपयांची देयके सप्टेंबर २०२६ पर्यंत प्रलंबित असल्याने १ नोव्हेंबरपासून राज्यातील अनेक भागांत महा लॅब, आपला दवाखाना आणि डायलिसिस केंद्रांच्या सेवा बंद पडल्याचे चित्र आहे. त्यामुळे हजारो गरीब रुग्णांच्या मोफत आरोग्य सुविधांवर गदा आली



आहे. एका बाजूला योजनांचा गाजावाजा आणि दुसऱ्या बाजूला आरोग्यसेवांसाठी निधी नसणे, हा सरकारचा कारभार आहे, असे त्या म्हणाल्या.

देशातील सरकारी कंपन्या आणि बँकांसारख्या सार्वजनिक मालमत्तांचे खासगीकरण आणि विक्री केल्यानंतर आता भाजप सरकारची नजर देशाच्या नैसर्गिक संसाधनांवर आहे. विकासाच्या नावाखाली भाजपशासित राज्यांसह देशभरात निसर्गाची बेछूट कत्तल सुरू आहे. महाराष्ट्रातील भीमाशंकर हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे.

उजनी धरण परिसरात प्रस्तावित असलेल्या एआय डेटा सेंटर प्रकल्पाबाबतही सरकार सोलापूरकरांना अपुरी माहिती देऊन दिशाभूल करत आहे. या प्रकल्पामुळे तालुक्यातील शेतकरी, मासेमार आणि अनेक गावांतील नागरिकांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच ध्वनिप्रदूषण आणि जलप्रदूषणामुळे पर्यावरण व वन्यजीवांवरही दुष्परिणाम होऊ शकतात. या सर्व बाबींची पुरेशी माहिती न देता हा प्रकल्प जनतेवर लादण्याचा सरकारचा अट्टाहास सुरू आहे. जनतेला पाणी, शेतकऱ्यांना सिंचन आणि स्थानिकांना रोजगार व सुविधा देण्याऐवजी त्यांच्या हक्काच्या नैसर्गिक संसाधनांवर डल्ला मारण्याचे काम सरकार करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

जंतरमंतरवर तरुण विद्यार्थी आंदोलनकर्त्यांवर लाठीचार्ज आणि पॅलेट गन वापरण्याचे आदेश देणारे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज संविधान वाचवण्यासाठी मोर्चे काढत आहेत, यापेक्षा भिकार राजकारण काय असू शकते? मणिपूरच्या प्रश्नावर भाजप गप्प आहे, अरुणाचल प्रदेशच्या सीमावादावर गप्प आहे. एसआयआर प्रक्रियेद्वारे किती बांगलादेशी नागरिकांना देशाबाहेर काढले, याचे उत्तरही भाजपकडे नाही. स्वतःच्या कारभारातील अपयश झाकण्यासाठी भाजपकडून अशा घोषणा आणि राजकीय दिखावा केला जात आहे, अशी टीका खासदार प्रणिती शिंदे यांनी केली.

अमित शाह लोकशाही वाचवण्याच्या आणि २०२९ चे आव्हान देण्याच्या बाता करतात. हिंमत असेल तर सरकार बरखास्त करा, ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवा आणि बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या. उद्याही निवडणूक घेतली तरी आम्ही तयार आहोत, असे खुले आव्हान त्यांनी दिले.

सरकारविरोधात जनतेमध्ये प्रचंड आक्रोश आहे. तरुणाईमध्ये अस्वस्थता आणि खदखद आहे. राहुल गांधी यांची वाढती लोकप्रियता पाहून भाजप सरकारचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळेच जनतेच्या खऱ्या प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी अशा प्रकारचे राजकारण केले जात आहे. मात्र जनता आता भाजपच्या भंपक घोषणांना बळी पडणार नाही. लोकशाही जिवंत राहण्यासाठी हा सत्ताधाऱ्यांचा डर चांगला आहे, असा टोलाही खासदार प्रणिती शिंदे यांनी लगावला.

'लोकतंत्र जिंदा रहने के लिए... ये डर अच्छा है!' असे म्हणत त्यांनी भाजप सरकारच्या दुटप्पी भूमिकेवर जोरदार निशाणा साधला.

या पत्रकार परिषदेला सोलापूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सातलिंग शटगार, अक्कलकोट तालुका अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष भीमाशंकर जमादार, उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष भारत जाधव, नगरसेवक नरसिंह आसादे, मुस्तफा बळोरगी, मीडिया प्रमुख तिरुपती परकीपंडला आदी उपस्थित होते.

झोळ कुटुंबाला धमक्यांचे फोन; मुलांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी!

वादग्रस्त राणा सूर्यवंशीविरुद्ध करमाळा पोलिसांत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद; शिक्षण संस्था, व्यवसाय आणि कुटुंबीयांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

करमाळा (कटूसत्य वृत्त): वाद कितीही गंभीर असला, तरी त्याचा निपटारा कायद्याच्या चौकटीतच व्हायला हवा. मात्र, करमाळा तालुक्यातील वाशिंबे येथील झोळ कुटुंबीयांना फोनवरून धमकावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. झोळ बंधूंना कायमचे संपवून टाकण्यापासून ते शिक्षण संस्थेला कुलूप लावण्यापर्यंत, मुलांच्या व्यवसायात अडथळे आणण्यापासून त्यांना खोट्या अमली पदार्थांच्या गुन्ह्यात अडकवण्यापर्यंतच्या धमक्या दिल्याचा गंभीर तक्रार वादग्रस्त राणा सुर्यवंशी याच्या विरोधात नवनाथ मधुकर झोळ यांनी करमाळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, सौरभ ऊर्फ राणा दिलीप सूर्यवंशी याच्याविरुद्ध अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांकडील अदखलपात्र अहवाल क्रमांक २१२५/२०२६ नुसार, भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२) आणि ३५२ अंतर्गत ही नोंद



करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, १२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आणि १३ ऑगस्ट रोजी दुपारी ११.३० वाजण्याच्या सुमारास नवनाथ झोळ यांच्या मोबाईलवर धमकीचे फोन आल्याचा आरोप आहे.

पोलीस राणाचा कायमचा बंदोबस्त करतील..!

राणा सुर्यवंशी पासून झोळ कुटुंबियांसह अन्य पिडीत कुटुंबियांना न्याय मिळावा. राणा सुर्यवंशी याने आमच्या कुटुंबियांसह अनेक कुटुंबियांना वेगवेगळ्या प्रकारच्या धमक्या देऊन मानसिक व आर्थिक त्रास देणे, ब्लॅकमेल करणे असे उद्योग केलेले आहेत व करीत आहे. अशा व्यक्तींचा कायमचा कायदेशीर बंदोबस्त करण्यासाठी पोलीसांकडे तक्रार दाखल केली असल्याचे नवनाथ झोळ यांनी सांगितले.

तक्रारीतील आरोप अधिक गंभीर आहेत. नवनाथ झोळ यांचे बंधू रामदास झोळ यांना कायमचे संपवून टाकण्याची, तसेच त्यांच्या शिक्षण संस्थेला कुलूप लावण्याची धमकी देण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. एवढ्यावरच न थांबता, पुत्र हर्षवर्धन यांच्या केळी व्यवसायात अडथळे निर्माण करून व्यवसायात अमली पदार्थ ठेवून त्यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिली आहे. तर दुसरे पुत्र सुदर्शन हे कर्नाटकातील बंगळुरू येथे वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. त्यांचे अपहरण करण्याची धमकी दिल्याची तक्रार झोळ यांनी पोलिसांत केला आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ दोन व्यक्तींमधील वाद न राहता एका संपूर्ण कुटुंबाच्या सुरक्षिततेशी संबंधित बनला आहे.

खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी म्हणजे कायद्यालाच आव्हान?

एखाद्याच्या व्यवसायात अमली पदार्थ ठेवून त्याला गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिल्याचा आरोप अत्यंत गंभीर आहे. हा आरोप खरा असल्यास संबंधित व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा, व्यवसायाचा आणि स्वातंत्र्याचा प्रश्न निर्माण होतो. तसेच शिक्षण संस्थेला कुलूप लावण्याची आणि विद्यार्थ्यांच्या अपहरणाची धमकी दिल्याचा आरोपही पोलिसांनी गांभीर्याने तपासण्याची गरज आहे.

या प्रकरणात फोन कॉलचे तपशील, संबंधित संभाषणांचे पुरावे आणि इतर उपलब्ध माहितीची पडताळणी करून निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. केवळ अदखलपात्र नोंद करून प्रकरण थांबणार की धमक्यांच्या आरोपांची सखोल चौकशी होणार, असा सवाल उपस्थित होत आहे.



झोळ कुटुंबाला संरक्षण मिळणार तरी कधी?

एका बाजूला कुटुंबीयांना जीवे मारण्याची, अपहरणाची आणि खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे, तर दुसऱ्या बाजूला पोलिसांनी अदखलपात्र नोंद केली आहे. त्यामुळे झोळ कुटुंबीयांना आवश्यक पोलीस संरक्षण देण्याबरोबरच या प्रकरणातील सत्य समोर आणण्याची जबाबदारी पोलिसांवर आहे.

धमकी देणारा कितीही प्रभावशाली असला, तरी कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे. तक्रारीतील आरोपांची निष्पक्ष चौकशी करून तथ्यांच्या आधारे कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सोलापूर बसस्थानकाच्या स्वच्छतेत आणखी सुधारणा करा

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे एसटी प्रशासनाला निर्देश

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवाशांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक प्रशासनाने आवश्यक सुविधांच्या पूर्ततेवर विशेष भर द्यावा, असे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज दिले.

मंत्री सरनाईक यांनी



आज सोलापूर मध्यवर्ती बसस्थानकाला भेट देऊन तेथील स्वच्छतागृहे, पाणपोई आणि इतर प्रवासी सुविधांची पाहणी केली. बसस्थानकात झालेल्या सुधारणांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. मात्र, स्वच्छतेच्या बाबतीत अद्याप सुधारणा करण्यास मोठा वाव असून, बसस्थानक परिसर स्वच्छ आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी प्रशासनाने अधिक दक्षतेने काम करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

या भेटीदरम्यान मंत्री सरनाईक यांनी बसस्थानकातील प्रवाशांशी थेट संवाद साधला. एसटीच्या नवीन बसेसबाबत प्रवाशांनी समाधान व्यक्त केले. भविष्यातही अशीच दर्जेदार सेवा मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्याचवेळी प्रवाशांनी स्थानिक समस्याही मंत्री महोदयांसमोर मांडल्या. दोन मुख्य शहरा दरम्यान विनावाहक सेवा (पान 2 वर..)



सर्व माजी संचालकांचे अर्ज बाद

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेतील निवडणुकांच्या रणधुमाळीत मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. येथील निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर आज अर्जांची छाननी करण्यात आली. त्यामध्ये, माजी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्यासह अनेक दिग्गजांचे अर्ज बाद करण्यात आले आहेत.

रणजितसिंह मोहिते पाटील यांच्यासह बँकेचे माजी संचालक माजी आमदार संजयमामा शिंदे, माजी आमदार राजन पाटील, माजी



आमदार दिलीप माने, माजी आमदार जयवंतराव जगताप, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, माजी आमदार प्रशांत परिचारक, ज्येष्ठ नेते सुरेश हसापुरे यांचेही अर्ज निवडणुकीतून बाद झाले आहेत.

यापूर्वी, बेकायदेशीर कर्जवाटप करत बँकेच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असल्याने माजी संचालकावर 2024 साली कारवाई करण्यात आली होती. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीतून 10 माजी संचालकांचे अर्ज बाद ठरवण्याचा निर्णय निवडणूक निर्णय अधिकारी मुकुंद पवार यांनी घेतला.

दरम्यान, राष्ट्रवादीचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि जिल्हा परिषद सदस्य अर्जुनसिंह मोहिते पाटील यांचा अर्ज मात्र वैध ठरवल्याने मोहिते पाटील कुटुंबाला काहीसा दिलासा मिळाला आहे. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत एकूण 201 उमेदवारांनी 238 अर्ज दाखल केले होते.

त्यातील 41 अर्ज बाद तर 30 अर्ज दुबार आहेत, त्यामुळे या निवडणुकीत एकूण 167 अर्ज वैध ठरवण्यात आले आहेत. वैध ठरवण्यात आलेल्या उमेदवारांना 17 नोव्हेंबरपर्यंत अर्ज माघार घेण्याची मुदत आहे. त्यामुळे, सोलापूर डीसीसी बँक निवडणुकीत कोण-कोण अर्ज माघार घेते हे देखील पाहावं लागेल.

स्थापना १९६७ | शासनमान्य | नोंदणी क्र.इ.३५९ (सोलापूर)

सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ, सोलापूर

हुतात्मा स्मारक,मार्कंडेय उद्यान,अशोक चौक पोलीस चौकी समोर,सोलापूर-४१३००५.

जावक क्र. ११५/२०२६-२७ | दिनांक : ०३/११/२०२६

वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

(फक्त सभासदांकरीता)

सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या सर्व सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२९/११/२०२६ रोजी दु. ३:०० वा. राजश्री शाहू महाराज सभागृह, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज, सरस्वती चौक, सोलापुर ४१३००१ येथे आयोजित करण्यात येत आहे. सभेस सर्वांनी उपस्थित रहावे. ही विनंती.

सभेपुढील विषय

१) दि. २८/१२/२०२५ च्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०२५-२६ चा वार्षिक अहवाल मंजुरीसाठी.
३) सन २०२६-२७ साठी ऑडिटरची नेमणूक करणेबाबत
५) सन २०२७-२८ चे अंदाजपत्रक मंजूरीसाठी
६) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय

टिप :- १.कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास अर्ध्या तासा नंतर त्याच ठिकाणी त्याच विषयासाठी सभा भरेल. यावेळी कोरमची आवश्यकता भासणार नाही.

२. आयत्या वेळचा विषय असेल तर लेखी स्वरुपात सूचक, अनुमोदकसह द्यावा.

३. सभेपुढील विषयांची कागदपत्रे पहावयाची असतील तर सभे अगोदर २ दिवस संघाच्या कार्यालयात पहावयास मिळतील.

सही (कार्यवाह) — **साहेबराव शिंदे**

सही (अध्यक्ष) — **ज्योतीराम गायकवाड**

संपादकीय

भुकेची चिंता कायम

नुकताच जागतिक भूक निर्देशांक जाहीर झाला आहे. 122 देशांची जी यादी जाहीर झाली आहे त्यात भारताचा क्रमांक शंभर इतका आहे. म्हणजे देशातील नागरिकांच्या भुकेची समस्या सोडवण्याच्या बाबतीत भारत 122 देशांमध्ये शंभरावा आहे, यावरून भारतातील भुकेची चिंता अजूनही किती गंभीर आहे याचा सहज अंदाज बांधता येतो.

दोन आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थांमार्फत दरवर्षी 'हंगर इंडेक्स'ची यादी जाहीर केली जाते. जगभरातील गरिबी आणि भुकेविरुद्धचा लढा प्रबळ करण्यास संबंधित देशांना मार्गदर्शन मिळावे आणि त्यांच्यामध्ये जागृती निर्माण व्हावी यासाठी 'हंगर इंडेक्स'ची यादी प्रसारित केली जाते. एखाद्या देशाचा भूक निर्देशांक मोजण्यासाठी कोणते निकष वापरले जातात याची शास्त्रोक्त माहिती या दोन्ही संस्थांनी दिली आहे. नागरिकांमध्ये विशेषतः बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण, बालकांमधील खुंटलेली वाढ, बालमृत्यूचे प्रमाण वगैरे निकष लावून हा भूक निर्देशांक मोजला जातो.

या निर्देशांकातील भारताचे स्थान पाहता भारतातील भुकेची चिंता मोठ्या प्रमाणात आहे आणि यावर अधिक व्यापकपणे कार्य करण्याची गरज आहे हा मुद्दा त्यातून अधोरेखित होतो. भारतात आज 80 कोटी लोकांना मोफत अन्नधान्य दिले जात असल्याची बाब आपण वेळोवेळी ऐकत आलो आहोत. असे असूनही भूक निर्देशांकाच्या बाबतीत भारताची स्थिती खालवण्याचे प्रमुख कारण तज्ज्ञ असं सांगतात की, आपण केवळ मोफत अन्नधान्य पुरवण्याने नागरिकांचे पुरेसे पोषण होत नाही, त्यासाठी नागरिकांना सकस अन्न मिळणेसुद्धा महत्त्वाचे आहे, तोच नेमका अडचणीचा भाग आहे.

देशातल्या आर्थिक स्थितीची पाहणी वेळोवेळी होत असते आणि त्याची आकडेवारीसुद्धा प्रकाशित होत असते. त्यानुसार देशातल्या नागरिकांची क्रयशक्ती आता कमी होत चालली असून त्यांचे उत्पन्नाचे स्रोत दिवसेंदिवस आकसत चालले आहेत. याचा मुख्य परिणाम त्यांच्या पोषण आहारावर होतो आणि त्यातूनच ही भुकेची समस्या गंभीर होत जाते. 2025 मध्ये भारत या यादीत 102 क्रमांकावर होता, तर त्याच्याही आधी म्हणजे 2024 या वर्षी भारत 105 व्या क्रमांकावर होता. या दोन वर्षातील स्थितीची तुलना केली तर यंदा भारताची स्थिती किंचित सुधारली आहे; पण ही सुधारणा समाधानकारक नाही. या यादीतील उत्तम स्थितीत असलेल्या देशांची नावे पाहिली तर त्यात बल्गेरिया, अर्मेनिया, चिली, चीन, जॉर्जिया, रोमानिया, सरबिया, लिथोनिया अशा देशांचाही समावेश आहे. त्या देशांच्या तुलनेत आपला भारत मात्र कमालीचा पिछडलेला असणे हे आपल्या महान देशासाठी निश्चितच लाजिरवाणे आहे. अशा स्वरूपाची आकडेवारी जेव्हा जाहीर होते आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची शोभा होते त्यावेळी सध्या सत्तेवर असलेल्या पक्षाचे समर्थक अशी पाहणी करर्णाया संस्थांवरच आक्षेप घेतात.

भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावरून बदनाम करण्याचा हा डाव आहे अशी आरोपांची राळही ते उडवून देतात. असे हल्ले करून तुम्ही विरोधकांचा आवाज दाबून टाकाल पण जी वस्तुस्थिती डोळ्यापुढे उभी राहिलेली आहे त्याच्यावर तुम्ही कशी मात करणार याचा बोध काही त्यातून होत नाही. किंबहुना खुद्द भारत सरकारही अशा स्वरूपाच्या जागतिक क्रमवारीच्या याद्यांना यत्किंचितही भीक घालत नाही. मागे एकदा याच भूक निर्देशांकाच्या यादीवर टीका करताना एक केंद्रीय मंत्री म्हणाले होते की, अशी पाहणी करर्णाया संस्थांचे लोक केवळ कोणालाही फोन करून त्यांना 'तू भुकेलेला आहेस का', असे विचारतात.

सकाळी लवकर विमान पकडण्यासाठी माझ्यासारखे लोक जेव्हा घरून काहीही न खाता विमानतळाकडे जात असतात त्यावेळी वाटेत ते भुकेलेलेच असतात, नेमका त्याचवेळी अशी पाहणी करर्णाया संस्थांचा फोन येतो आणि आपसुकच त्याला उत्तर देणारा माणूस 'होय मी भुकेलेला आहे' असे उत्तर देतो. त्यावरून हे लोक एखाद्या देशाची भुकेची स्थिती तपासतात, अशी खिल्ली त्या मंत्र्यांनी उडवली होती. यावरून सरकार अशा पाहणीला किती किंमत देते हे सहज लक्षात येते. पण आंतरराष्ट्रीय संस्था मात्र विशिष्ट निकषानुसार काम करीत असल्याने त्यांच्याकडून जाहीर होणारे निष्कर्ष असे आपल्याला सहजासहजी धुडकावता येणार नाहीत. त्यामुळे नव्याने प्रकाशित झालेल्या या हंगर इंडेक्सविषयी भारताने नक्कीच आत्मपरीक्षण करायला पाहिजे आणि त्याला अनुरूप उपाययोजना हाती घेतली पाहिजे. पाच किलो मोफत धान्य दिल्यानंतर आपली जबाबदारी संपली अशा भूमिकेत सरकारला राहता येणार नाही. मोफत धान्य देणे अन्नसुरक्षा कायद्यानुसार सरकारसाठी अनिवार्य बाब ठरली आहे त्यामुळे त्याचाही सरकारला फार डांगोरा पिटून चालणार नाही. देशातल्या नागरिकांची मूलभूत अन्नाची सोय योग्य तऱ्हेने व्हायला हवी याची खबरदारी तरी सरकारने घ्यायला हवी. त्यासाठी काय उपाययोजना करता येणे शक्य आहे याबाबत सरकारने स्वयंसेवी संस्था आणि तज्ज्ञांची व्यापक स्तरावर चर्चा करायला हवी. समस्या गंभीर आहे, प्रयत्नही तितकेच गांभीर्याने हाती घेणे गरजेचे आहे.

दुष्काळाचे आव्हान कसे पेलणार

दुष्काळ तसा महाराष्ट्राला नवीन नाही. दर सात – आठ वर्षांनी महाराष्ट्राला दुष्काळ सदृश परिस्थितीला किंवा भीषण दुष्काळाला सामोरे जावे लागते.यंदा प्रशांत महासागरात सुपर एल निनो अधिक प्रभावित झाल्यामुळे महाराष्ट्रास देशातील बारा राज्यात सरासरी पेक्षा पाऊस कमी पडेल.असा अंदाज हवामान तज्ञांनी वर्तविला होता आता त्या अंदाजाची प्रचिती प्रत्यक्षात आली आहे. यामुळे पाणी टंचाई, महागाई, ऊर्जा, रोजगार आणि अर्थ व्यवस्थेवर गंभीर संकट ठरू शकते. भारतासाठी ही केवळ हवामान खात्या तील नैसर्गिक घटना नसून देशातील काही भागात प्रचंड दुष्काळ पडू शकतो.अगोदरच ग्लोबल वार्मिंग मुळे पृथ्वी प्रचंड गरम झालेली आहे.अशा परिस्थितीत सुपर एल निनोमुळे पृथ्वीचे तापमान प्रचंड वाढले. गेल्या ७५ वर्षात सुपर एल निनोचा जो प्रभाव पाहायला मिळाला नाही. तो यंदा पाहायला मिळत आहे. हवामान तज्ञांनी इशारा दिल्या प्रमाणे महाराष्ट्रात २०२६ मध्ये सरासरीपेक्षा पाऊस कमी पडला. जून ते सप्टेंबर या तीन महिन्याच्या काळात राज्यात ७५५ मिमी पाऊस झाला. तर सरासरी ९३२.३ मिमी आहे, म्हणजे एकूण तूट १८.८ टक्के आहे. संपूर्ण खरीप पिकाच्या हंगामावर खर्च करून ही शेतकऱ्यांच्या हाती काहीही लागले नाही. संपूर्ण खरीप पिकाचा हंगाम वाया गेला. सोयाबीन, कापूस, मूग आणि अन्य पिकांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे.पिण्याच्या पाण्या बरोबरच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.कमी पावसामुळे मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पां मधील पाणी साठ्यात त्यामध्ये अपेक्षित वाढ झालेली नाही. त्यामुळे आगामी रब्बी हंगाम आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. आताच ग्रामीण भागात लोकांना वणवण भटकंती करावी लागत आहे. शहरी भागात सुद्धा पाणी कपात करावी लागली आहे. जनावरांना चारा नाही.तेव्हा परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने ३५८ तालुक्या पैकी पहिल्यांदा २६५ तालुक्यात आणि नंतर ४० तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर केला आहे. हा दुष्काळ १९७२ पेक्षा अधिक गंभीर असली,तरी १९७२ नंतर परिस्थितीत खूपच बदल झाला आहे. परंतु प्रशासकीय निकषां नुसार एवढया मोठ्या प्रमाणावर एकाच वेळी तालुक्यांची संख्या नोंदवली गेली नव्हती. याचाच अर्थ राज्याच्या तब्बल ८५ टक्के भागात दुष्काळ पडला आहे. मराठवाडा, विदर्भ, तसेच पश्चिम महाराष्ट्रातील काही भाग हे नेहमी दुष्काळ सदृश परिस्थिती असते. पण ज्या कोकणात जास्त प्रमाणात पाऊस पडतो. त्या कोकणात सुध्दा दुष्काळ ग्रस्त तालुके जाहीर करावे लागले. यावरून परिस्थिती किती भीषण होऊ शकते याचे संकेत मिळतात.. यावर्षी दुष्काळाचा फटका केवळ

महाराष्ट्रा पुरता नाही तर महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यातील काही भागांना दुष्काळी परिस्थितीचा फटका बसणार आहे. सरकारने दुष्काळावर मात करण्यासाठी अनेक घोषणा केल्या आहेत.जेथे पाऊस नाही तेथे शेत मजुरांच्या रोजगाराची समस्या निर्माण होऊ नये म्हणून रोजगार हमी योजनेची कामे सुरू करणार, कर्ज वसुलीला स्थगिती, कृषिपंपाच्या वीजबिलात सवलत, विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ, टँकरने पाणी पुरवठा, जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था, दुष्काळग्रस्त भागात जमीन महसूल माफी. अशा आदी घोषणा केल्या आहेत. तसेच पीक नुकसानीचे पंचनामे करून त्यावर मदतीचा निर्णय घेतला जाईल,अशी भूमिका सरकारने घेतली आहे. राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी तून मदत मिळविण्यासाठी पंचनामे आवश्यकआहेत. पण पंचनाम्याची प्रक्रिया हा मदतीचा पर्याय होऊ शकत नाही. सरकारने दुष्काळग्रस्त गावांना टँकरने पाणी पुरवठा करण्याची घोषणा केली आहे , परंतु पाण्याचे साठे जसजसे संपतील तसतशी टँकर ग्रस्त गावांची संख्या वाढत जाणार आहे. सरकारने पिण्याचे पाणी पुरविण्याबाबत हमी घेतली असली, तरी ज्या शेतकऱ्यांचे संपूर्ण जीवन केवळ शेतीवरच अवलंबून आहे अशा शेतकऱ्यांचे काय ? सरकारचे सर्व लक्ष रोजगार हमी योजनांवर आहे.पण आजच्या काळात तुटपुंज्या रोजगार हमीवर जनतेची गुजराण होईल, अशी परिस्थिती सध्या नाही. कारण सरकारची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. अंदाजे ११ लाख कोटी रुपयांचे कर्ज डोक्यावर आहे. पुढे हे कर्ज वाढू शकते. कारण गेल्यावर्षी राज्यात अतिवृष्टीग्रस्तांना सुमारे ३२ हजार कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली होती. ती अजूनही काही शेतकऱ्यांना मिळालेली नाही. नुकतीच सरकारने शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची ' पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना मंजूर केली आहे.त्याचा फायदा जवळपास ५५ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. हा भार सरकारच्या डोक्यावर असताना, आता नव्याने दुष्काळाच्या योजनांचा भार येणार आहे.देशात महाराष्ट्र एक आघाडीचे राज्य म्हणून ओळखले जाते. पण या राज्यातही मराठवाडा, विदभार्तील काही भाग, तसेच सोलापूर, नाशिक सांगली आदी काही भागातील काही तालुके हे सतत अवर्षणग्रस्त आणि दुष्काळग्रस्त असतात. पण सरकार हे मान्य करीत नाही. यंदा दुष्काळ क्षेत्र वाढले आहे. १९७२ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. त्याच्या कडवट आठवणी आजही जुन्या जाणत्या लोकां कडून जेव्हा ऐकायला मिळतात. तेव्हा अंगावर शहारे येतात. १९७२ च्या दुष्काळावेळी राज्या कडे अन्नधान्याची प्रचंड कमतरता निर्माण झाली होती .अमेरिकेत जनावरांना चारा म्हणून घालण्यात येणारा गहू त्यावेळी रेशनच्या दुकानातून लोकांना देण्यात येत होता.तसेच हजारो नागरिक आणि पाळीव प्राण्यांचे जीव गेले होते. लोकांना शेती सोडून शहरांकडे स्थलांतरित झाले होते. यावेळी सुद्धा तशीच भीषण परिस्थिति निर्माण झाली आहे, यात शंका नाही. पावसाने ओढ दिल्याने पुढला उन्हाळा कसा जाईल ते सांगता येणार नाही. अन्नधान्यांचा साठा, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, दुष्काळी कामे, सर्वात महत्त्वाचे म्हणजे पाण्याचा प्रश्न, असे असंख्य प्रश्न आवासून उभे राहणार आहेत. मुंबईत जवळपास १६०० मिमी पाऊस पडतो. यंदा पुरेसा पाऊस झाला नाही. मे महिन्यापासून सुरू केलेली दहा टक्के पाणी कपात ती सुरूच राहणार आहे. कारण आज शहरात आलिशान मोठमोठे टॉवर उभे राहिले आहेत आणि राहत आहेत.मुंबईची लोकसंख्या गेल्या १५ वर्षात २.५० कोटीच्यावर गेली आहे. त्या तुलनेत मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणाची संख्या वाढली नाही.जी धरणे तलावे आहेत तीच आहेत. पाणी साठविण्यासाठी कोणतीही योजना आखली गेली नाही. अशीच परिस्थिती राज्याच्या इतर शहरात सुध्दा आहें.तसेच पाणी टंचाईच्या काळात टँकरने पाणी पुरवठा हा दुष्काळी भागातील लोकांना मोठा आधार असतो.

प्रत्येक जिल्ह्याला आवश्यक प्रमाणात पाणी उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी असते.पण गेल्या काही वर्षात मोठया किंवा मध्यम धरणांची निर्मिती झाली नाही,हे खेदजनक आहे.आणि सरकार विकासाच्या गप्पा मारत असते. २०१६ मध्ये फडणवीस मुख्यमंत्री असताना जलयुक्त शिवार अभियान योजना राबविण्यात आली. तसेच पाणी जिरवा पाणी अडवा ही योजना सुद्धा यशस्वी झाली नाही. ही योजना किती यशस्वी झाली हा एक प्रश्न आहे.राज्य सरकारने दुष्काळग्रस्तांसाठी ज्या योजना घोषित केल्या आहेत, त्यांची योग्यरीत्या अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.कारण सरकारने कितीही म्हटले तरी काही वेळा प्रत्यक्षात काहीही होत नाही.हा आजवरचा अनुभव आहे.

दुष्काळ, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी वादळे ही सर्व नैसर्गिक संकटे आहेत. अशा संकटात संकटग्रस्ताना धीर देण्याऐवजी संकटाचे राजकारण करण्याची सवय सत्ताधारी आणि विरोधी पक्षांना झाली आहे.असे म्हटले तर वावगे ठरू नये. .दुष्काळग्रस्तांना प्रथम पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, रोजगार हमी योजना, जीवनावश्यक सुविधा तातडीने दिल्या पाहिजेत. नाही तर लाखो दुष्काळग्रस्त कुटुंबे शहराकडे स्थलांतर करण्याची शक्यता आहे. तो दुष्काळात तेरावा महिना ठरेल. ते स्थलांतर रोखण्यासाठी जाहीर केलेल्या प्रयत्न केले जावेत. निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांला प्रति हेक्टरी जास्तीत जास्त मदत करण्यात यावी.केंद्र सरकारचे एक पथक सर्व

दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करून गेले. या पथकाच्या अहवालाच्या आधारे केंद्र सरकार कडून मदत मिळते.राज्य सरकारने दुष्काळी खर्च भरून काढण्यासाठी सुमारे चाळीस हजार कोटी रुपयांची मागणी केंद्र सरकार कडे केली आहे. परिस्थिती भीषण आहे यात शंका नाही. अशा वेळी केंद्र सरकारने महाराष्ट्राला मदत जाहीर करावी. कारण केंद्र सरकारला महाराष्ट्रातून अब्जावधी रुपये जीएसटी किंवा अन्य मागार्ने मिळत आहेत. आता राज्यात आणि केंद्रात एकाच पक्षाची सरकारे आहेत. आजची परिस्थिती ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून मानव निर्मित आहे.असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.कारण गेल्या काही वषार्पासून विकासाच्या नावाखाली जंगल तोडणे , झाडे तोडणे, सिमेंटची जंगले तयार करणे असे सुरू आहे. जंगले नष्ट झाली तर पावसाचे प्रमाण कमी होते.पाणी जमिनीत मुरण्या ऐवजी वाहून जाते.भूजल पातळी सतत खालावत आहे. हवामान बदलामुळे पावसाचे चक्रही अनियमित झाले आहे. त्यातच एल निनो चे संकट आहेच. दुष्काळाचे संकट कायमचे संपवणे शक्य आहे. मात्र त्यासाठी सरकारच्या इच्छाशक्तीची गरज आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजी नगर येथे म्हटले आहे की, पुढील पिढीला दुष्काळ बघावा लागणार नाही. ही घोषणा प्रत्यक्षात आणण्यासाठी सरकारने आतापासून प्रयत्न सुरू करावेत. कारण दुष्काळामुळे शेती अर्थव्यवस्था विस्कळीत होतेच, शिवाय अन्नधान्याचे उत्पादन कमी होते. परिणामी महागाई वाढते.तेव्हा दुष्काळी भागात पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीचा प्रश्न आहे. यातील कोणत्या प्रश्नाला महत्व द्यावे ते ठरवावे. दीर्घकालीन योजना आखून नियोजन करणे आवश्यक आहे. कारण एल निनोचा प्रभाव हा दिवसेंदिवस वाढतच आहे.त्यादृष्टीने नियोजनाची गरज आहे. मदतीचे निकष बदलणे महत्वाचे आहे.याकडे सरकारने गांभीर्य दाखवले तर दुष्काळावर मात करणे शक्य होईल.यापुढेही एल निनो आणि हवामान बदलामुळे पाऊस हा बेभरवशाचा असणार आहे. तेव्हा महाराष्ट्राला दुष्काळ निवारणा पेक्षा दुष्काळ व्यवस्थापनाची गरज आणि त्याहून पुढे दुष्काळ प्रतिरोधक कृषी व्यवस्थेची गरज आहे. सरकारने प्रथम कृती आराखडा तयार करण्याची गरज आहे. नवीन रोजगार हमी योजने मार्फत रोजगार,आरोग्य सेवा, वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात करणे, पाण्याचे नियोजन करणे, पिकांचे पारंपरिक पद्धतीने नियोजन करावे लागेल. तसेच कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देणे. पाण्याची बचत करणाऱ्या सिंचन पद्धतीचा वापर करावा.नद्यांचे पुनरुज्जीवन करून भूजल पातळीत सुधारणा करावी. शेतकऱ्यांसाठी हवामान अंदाज अधिक अचूक आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा करावा.तसेच तात्पुरत्या योजनांऐवजी दीर्घकालीन दृष्टीने पाहावे लागेल सरकारने योग्य निर्णय घेतले, तर दुष्काळाची तीव्रता कमी होईल.तसेच नवीन धोरणे आखावी जेणेकरून कोरडा किंवा ओला दुष्काळ रोखता येईल.



- सुनील कुवरे, शिवडी (मुंबई)
मोबाईल 9167364870

जिल्ह्यातील नागरिकांनी अवैध सावकारीविरोधात तक्रार करावी- जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन



सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर खाजगी सावकारांनी शेतकऱ्यांकडून सक्तीने कर्जवसुली करू नये, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी शासन निर्णय जाहीर झाल्यानंतर दिलेले होते. तरीही जिल्ह्यात खाजगी सावकारांकडून धमकी देऊन किंवा बळाचा वापर करून कर्जवसुली केली जात असल्यास नागरिकांनी तात्काळ संबंधित तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. या परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि त्यांच्यावर कर्जवसुलीसाठी कोणताही अनुचित दबाव आणला जाऊ नये, यासाठी जिल्हाधिकारी यांनी संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था मुकुंद पवार यांनी जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये तालुका सहाय्यक निबंधकांच्या अध्यक्षतेखाली दक्षता पथकांची स्थापना केली आहे. या पथकांमध्ये सहकार विभागातील अन्य अधिकाऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. खाजगी सावकारीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होऊ नये आणि अवैध सावकारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी या पथकांमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

सोनके येथे चार जणांच्या घरांची झडती

अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाने पंढरपूर तालुक्यातील मौजे सोनके येथे दि. २ नोव्हेंबर रोजी कारवाई केली. महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम, २०१४ मधील कलम १६ अन्वये करण्यात आलेल्या या कारवाईदरम्यान सागर जनार्दन कोळेकर, सचिन मारुती पाटील (खरात), रणजित आजिनाथ कोळेकर आणि महेश गलांडे या सोनके येथील चार रहिवाशांच्या घरांची झडती घेण्यात आली.

तक्रार करण्याचे आवाहन

जिल्ह्यात कुठेही अवैध सावकारी होत असल्याची माहिती किंवा तक्रार असल्यास नागरिकांनी संबंधित तालुक्याच्या सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा. अवैध सावकारीला बळी पडू नये तसेच सक्तीच्या कर्जवसुलीविरोधात प्रशासनाकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी केले आहे.

पान १ वरून

सोलापूर बसस्थानकाच्या स्वच्छतेत...

सुरू करण्याची मागणी प्रवाशांनी केली. प्रवाशांच्या तक्रारी आणि सूचनांची दखल घेत मंत्री सरनाईक यांनी संबंधित एसटी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

प्रवाशांच्या सोयीसाठी आणि त्यांच्या समाधानासाठी एसटी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रवाशांना उत्तम सुविधा, स्वच्छ बसस्थानके आणि समाधानकारक प्रवास अनुभव देणे हे एसटी महामंडळाचे प्राधान्य आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी स्थानिक प्रशासनाने सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहनही मंत्री सरनाईक यांनी केले.

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचा ॲडव्हान्स हप्ता 3000 रू. जमा

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर व युनिट नं.2 करकंब कारखान्याचा सन 2026-2027 चा गाळप हंगाम सुरू झालेला असून या हंगामात गाळपास येणा-या ऊसासाठी ॲडव्हान्स हप्ता प्रती टन 3000 रुपए प्रमाणे ऊस बिल शेतक-यांच्या बँक खात्यात जमा करणेत आले आहे अशी माहीती कारखान्याचे संस्थापक चेअरमन मा.आ.बबनराव शिंदे यांनी दिली.


अधिक माहीती देताना संस्थापक चेअरमन बबनराव शिंदे म्हणाले, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर व युनिट नं.2 करकंब या कारखान्याचा सन 2026-27 चा गाळप हंगाम दि.15 ऑक्टोबर पासून सुरू झालेला आहे. आजअखेर युनिट नं.2,34,507 मे. टन व युनिट नं.2 कडे 80,901 मे.टन असे एकूण 3,15,408 मे.टन गाळप झालेले आहे.

सन 2026 चे दिपावली सणासाठी या हंगामामध्ये युनिट नं.1 व 2 कडे दि.15 ते 25 ऑक्टोबर दरम्यान गळीतास आलेल्या ऊसाचे प्रति टन रू.3000/- प्रमाणे ॲडव्हान्स हप्ता ऊस पुरवठादारांच्या खात्यात जमा केला असून त्यासाठी एकूण 56 कोटी रुपए अदा करणेत आले आहे. या हंगामात देखील 10 दिवसाला ऊस बिल पेमेंट अदा केले जाणार आहे. तसेच दि.26 ते 31 ऑक्टोबर या कालावधीत गळीतास आलेल्या ऊसाचे बिल दिपावलीसणासाठी पुढील 3 ते 4 दिवसात शेतक-यांच्या खात्यात वर्ग करीत आहोत. कारखान्याचे दोन्ही युनिटचे अधिकारी व कर्मचारी यांना दिपावली सणासाठी 8.33 टक्के बोनस रक्कम अदा करण्यात आली आहे.

कारखान्याची ऊस व तोडणी वाहतूक बिले वेळेत मिळत असल्याने अनेक शेतकरी व वाहनमालक त्यांचा ऊस विठ्ठलराव शिंदे कारखान्याकडे देण्यास प्राधान्य देत आहेत. सन 2026-27 गळीत हंगामामध्येही ऊस पुरवठादारांनी त्यांचा ऊस विठ्ठलराव शिंदे कारखान्यास पुरवठा करून हंगाम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन मा.आ.शिंदे यांनी केले.

सदरप्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन पोपटभाऊ गायकवाड. कार्यकारी संचालक एस.एन.डिग्रजे, युनिट नं.2 चे जनरल मॅनेजर पी. एस.येलपले व इतर खातेप्रमुख उपस्थित होते.

जिल्ह्यातील 170 गावांना 183 टँकरद्वारे पाणीपुरवठा



सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यात टंचाई निवारणार्थ दि. 03 नोव्हेंबर 2026 रोजी 170 गावे व 853 वाड्यांमधील 3 लाख 43 हजार 911 नागरिकांना व 99 हजार 126 पशुधनाला 170 टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. याशिवाय 48 विहिरी व 24 बोअर असे एकूण 72 जलस्रोत अधिग्रहित करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व्ही.डी. राठोड यांनी दिली.

तालुकानिहाय मंगळवेढा 42 गावे – 45 टँकर, सांगोला 28 गावे – 39 टँकर, अक्कलकोट 19 गावे – 13 टँकर, माढा 16 गावे – 21 टँकर, बार्शी 17 गावे – 6 टँकर, करमाळा 14 गावे – 11 टँकर, माळशिरस 11 गावे – 11 टँकर, उत्तर सोलापूर 9 गावे – 16 टँकर, दक्षिण सोलापूर 7 गावे – 10 टँकर, मोहोळ 7 गावे – 11 टँकर असून पंढरपूर तालुक्यात एकही टँकर सुरू नाही. जिल्ह्यात टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सोलापूर जिल्ह्यात अभिनव शाळा तपासणी पॅटर्न राबविणार- चेतनसिंह केदार-सावंत

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री, आमचे मार्गदर्शक जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद सोलापूरच्या शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक आणि गुणवत्तापूर्ण परिवर्तन घडवून आणण्यासाठी आरोग्य व शिक्षण समितीचे सभापती मा. चेतनसिंह केदार-सावंत यांनी महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, शाळांमध्ये सक्षम शैक्षणिक वातावरण आणि शिक्षण विभागाच्या कामकाजात प्रभावी सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने आयोजित शिक्षण समितीच्या बैठकीत त्यांनी विविध महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

तालुकास्तरावर राबविण्यात येत असलेला अभिनव शाळा तपासणी पॅटर्न संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात लागू करण्याची सूचना त्यांनी केली. शाळांची तपासणी केवळ कागदपत्रांपुरती मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, शिक्षकांचे अध्यापन, शाळांमधील भौतिक सुविधा आणि शैक्षणिक वातावरणाचा सर्वांगीण आढावा घेण्यावर त्यांनी भर दिला. शाळा तपासणी ही केवळ औपचारिकता न राहता विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीचे प्रभावी माध्यम ठरावे, अशी भूमिका त्यांनी मांडली.



शिष्यवृत्ती परीक्षेची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने सध्या चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांपुरती असलेली संधी अधिक व्यापक करून सर्व इयत्तांतील विद्यार्थ्यांना परीक्षेत सहभागी होता यावे, यासाठी आवश्यक नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती, शैक्षणिक गुणवत्ता आणि प्रोत्साहन वाढविण्यावर यामुळे भर देता येणार आहे.

जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांचा मालकी हक्क जिल्हा परिषदेकडे घेण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या प्रक्रियेत येणाऱ्या तांत्रिक अथवा प्रशासकीय अडचणी समितीसमोर मांडून त्यावर योग्य तोडगा काढण्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय, जवाहरलाल नेहरू मुलांचे वसतिगृह आणि सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह येथील भौतिक सुविधांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्यांना सुरक्षित, सुविधायुक्त आणि दर्जेदार निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या बाबींचा आढावा घेण्यात येणार आहे.

या बैठकीस आरोग्य व शिक्षण समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत, शिक्षण समिती सदस्य चंद्रकांत ज्ञानेश्वर जाधव, श्रुती भोरगुंडे, सुषमा नारनवर, विजयराज डोंगरे, शिवराज म्हेत्रे, प्राथमिक शिक्षणाधिकारी विशाल मुळे, उपशिक्षणाधिकारी, शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी तसेच सर्व गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला केंद्रस्थानी ठेवून शाळा व्यवस्थेत प्रभावी सुधारणा, शिक्षण विभागाच्या कामकाजात गतिमानता आणि जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

वात्रटिका

जोहार दिल्ली

मिटता मिटेना त्यांचा
पड्द्यामागचा घोळ...
नेतृत्वाशिवाय भेटीगाठीने
वाढला संशयकल्लोळ...
त्यांच्या दरबारात जाऊन
यांचा पुन्हा जोहार आहे...
महाराष्ट्राच्या भाळी आता
हा नवाच रिवाज आहे...

हणमंत पडवळ
धाराशिव
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

तुळशी गावाच्या व्यथा ऐकण्यासाठी शरद पवार थेट दुष्काळग्रस्त गावात!

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- गेल्या ३५ वर्षांपासून पाण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या आणि दुष्काळाच्या भीषण संकटामुळे चक्क विक्रीला काढण्याची वेळ आलेल्या तुळशी गावाच्या मदतीसाठी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार सरसावले आहेत. गावातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी त्यांनी तुळशी गावाला भेट देत ग्रामस्थांशी संवाद साधला आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. पिण्याचे पाणी, शेतीचे पाणी, जनावरांचा चारा आणि अडचणीत आलेला दुग्धव्यवसाय यांची माहिती घेत त्यांनी गावासाठी सुमारे ५० लाख रुपयांच्या निधीचा धनादेश देत आर्थिक मदतीचा हात पुढे केला. तसेच तुळशी गावाच्या दुष्काळी परिस्थितीची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे आणि खासदार धैर्यशील मोहिते-पाटील प्रत्यक्ष भेट घेऊन पाठपुरावा करतील, अशी ग्वाहीही त्यांनी ग्रामस्थांना दिली.

सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी तुळशी गावाला भेट दिली. यावेळी गावातील पाणीटंचाईची भीषणता आणि ग्रामस्थांना भेडसावणाऱ्या समस्यांची त्यांनी प्रत्यक्ष माहिती घेतली. गेल्या अनेक वर्षांपासून पाण्यापासून वंचित असलेल्या या गावात सध्या पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतीसाठी पाणी नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून पशुधन जगविण्याचे मोठे आव्हान ग्रामस्थांसमोर उभे राहिले आहे.



तुळशी गावाचा प्रमुख व्यवसाय असलेल्या दुग्ध व्यवसायालाही दुष्काळाचा मोठा फटका बसला आहे. गावात सुमारे १० हजार लहान-मोठी जनावरे असून पूर्वी दररोज जवळपास ४० हजार लिटर दूध संकलन होत होते. मात्र, जनावरांना पुरेसा चारा आणि पाणी मिळत नसल्याने दूध उत्पादनात घट झाली आहे. जनावरांचे संगोपन करणेही कठीण बनल्याने पशुपालक शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. या परिस्थितीची माहिती घेत शरद पवार यांनी दुग्ध व्यवसायाच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त केली.

यावेळी ग्रामस्थांनी सीना-माढा उपसा सिंचन योजनेचे पाणी तुळशी गावाला तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी शरद पवार यांच्याकडे केली. गेल्या ३५ वर्षांपासून गावाला पाण्यापासून वंचित ठेवल्याची भावना व्यक्त करत ग्रामस्थांनी आपली व्यथा मांडली. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत गावात तातडीने चारा डेपो सुरू करावा, जनावरांसाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध करून द्यावा, तसेच पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली.

गाव विक्रीला काढण्याची वेळ का आली, ग्रामस्थांनी मांडली व्यथा!

गेल्या ३५ वर्षांपासून पाण्यापासून वंचित राहिल्याने तुळशी गावातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. शेतीला पाणी नाही, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे, जनावरांना चारा-पाणी मिळत नाही, अशा परिस्थितीत जगणे अवघड झाले आहे. सरकार आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आम्हाला चक्क गावच विक्रीला काढण्याचा निर्णय घ्यावा लागला, अशी व्यथा ग्रामस्थांनी शरद पवार यांच्यासमोर मांडली. या गावाला पाणी मिळवून देण्यासाठी आपण विशेष लक्ष घालावे आणि आम्हाला न्याय मिळवून द्यावा, अशी आर्त विनवणी ग्रामस्थांनी केली.

यावेळी आमदार अभिजित पाटील यांनी तुळशी गावाच्या पाणीप्रश्नाबाबत माहिती दिली. आमदार झाल्यानंतर तुळशी गावाचा प्रश्न विधिमंडळात मांडला असून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. गावाच्या शेतीच्या पाण्याच्या प्रश्नासंदर्भात सातत्याने शासनाकडे पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले की, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी दौरा सुरू केला आहे. आज आणि उद्या ते सोलापूर जिल्ह्यातील विविध भागांना भेट देणार आहेत.

या दौऱ्यादरम्यान माध्यमांशी संवाद साधताना शरद पवार यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य अधोरेखित केले. सध्या आपण दुष्काळाची प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेत असून, आज माढा तालुक्यातील दुधाळी परिसराला भेट देणार

सोलापूर जिल्ह्यातील विकासकामांच्या आठवणींना शरद पवारांनी दिला उजाळा !

तुळशी गावातील ग्रामस्थांशी संवाद साधताना शरद पवार यांनी सोलापूर जिल्ह्यातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील हे सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना आणि आपण सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री असताना जिल्ह्यात विविध विकासकामे केली होती, असे त्यांनी सांगितले. त्या काळातील विकासकामांच्या आठवणी त्यांनी यावेळी ग्रामस्थांसमोर कथन केल्या.

दुष्काळाच्या परिस्थितीची बारकाईने माहिती घेतली. या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी सरकारकडे पाठपुरावा केला. त्यानंतर आठ दिवसांच्या आत सरकारने दखल घेत संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर केला, असे त्यांनी नमूद केले. दुष्काळासंदर्भात सरकारला पाठविलेल्या पत्राचे वाचन यावेळी मनोज शहा यांनी केले.

उजनी धरणातील सुमारे १९ टीएमसी गाळ काढण्याची आवश्यकता असल्याचे सांगत खासदार मोहिते-पाटील यांनी धरणातील गाळ काढल्यास पाणीसाठ्याची क्षमता वाढण्यास मदत होईल, असे मत व्यक्त केले. तसेच उजनी धरणावर प्रस्तावित असलेल्या मंगळवेढा, दक्षिण सोलापूर यांसह भविष्यातील विविध सिंचन योजनांना पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने गाळ काढण्याचा विषय महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

तुळशी गावातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केल्यानंतर शरद पवार यांनी गावासाठी सुमारे ५० लाख रुपयांच्या निधीचा धनादेश दिला. दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या ग्रामस्थांना या मदतीमुळे दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, केवळ आर्थिक मदतीने प्रश्न सुटणार नसून गावाला कायमस्वरूपी पाणी उपलब्ध होण्यासाठी शासनस्तरावर ठोस निर्णय होणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

यावेळी सरपंच डॉ. शरद मोरे, मनोज शहा आणि प्रमोद वसेकर यांनी शरद पवार यांनी तुळशी गावाच्या प्रश्नात विशेष लक्ष घालून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली. तसेच कोणत्याही कंपनीच्या सीएसआर निधीतून गावाला मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी विनंतीही त्यांनी केली.

या प्रसंगी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार अभिजित पाटील, मोहोळचे आमदार राजू खरे, भारत शिंदे, वसंत देशमुख, शिवाजी पाटील, सक्षणा सलगर, पल्लवी पाटील, विनंती कुलकर्णी, मृदुला तळेकर, अश्विनी लोकरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

शरद पवार यांच्या तुळशी गाव भेटीमुळे गेल्या ३५ वर्षांपासून प्रलंबित असलेला पाणीप्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. गावाचा पाणीप्रश्न, जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता आणि दुग्ध व्यवसायाला उभारी देण्यासाठी आता शासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. शरद पवार यांनी घेतलेल्या या पुढाकारानंतर तुळशी गावाला कायमस्वरूपी पाणी मिळणार का, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

संशोधनाला चालना देत आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांचा भर

मुंबई, (कटूसत्य वृत्त):- राज्यातील आरोग्यसेवा अधिक गुणवत्तापूर्ण, परिणामकारक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या गरजांशी सुसंगत करण्यासाठी संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान आणि वैद्यकीय शिक्षण यांची सांगड घालण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे सर्वसामान्यांना अधिक सक्षम आरोग्य सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून वैद्यकीय शिक्षण विभागाने हे महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागासोबत द इंटरनॅशनल क्लिनिकल एपिडेमिऑलॉजी नेटवर्क या आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थेच्या सहकार्याने आरोग्यविषयक संशोधन, संशोधकांचे प्रशिक्षण, वैद्यकीय महाविद्यालयांची संशोधन क्षमता आणि धोरणनिर्मिती अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण संधी उपलब्ध होणार आहेत. आरोग्य क्षेत्रातील निर्णय केवळ उपलब्ध माहितीवर नव्हे, तर शास्त्रीय संशोधनातून प्राप्त झालेल्या पुराव्यांवर आधारित असावेत, हा या सहकार्याचा प्रमुख उद्देश आहे. राज्यातील आरोग्यविषयक प्राधान्यक्रम निश्चित करणे, विविध आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन करणे, आरोग्यसेवेतील त्रुटी ओळखणे आणि त्यावर परिणामकारक उपाययोजना विकसित करणे यासाठी या सहकार्याचा उपयोग होऊ शकणार आहे. यामुळे शासकीय आरोग्य योजनांची परिणामकारकता वाढविण्यासह नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यास मदत होईल.

संशोधन क्षेत्रातील जागतिक अनुभवाचा महाराष्ट्राला लाभ

द इंटरनॅशनल क्लिनिकल एपिडेमिऑलॉजी नेटवर्क ही भारतात नोंदणीकृत ना-नफा तत्वावर कार्य करणारी संस्था असून, तिची स्थापना १९८० मध्ये रॉकफेलर फाउंडेशनच्या अर्थसहाय्याने करण्यात आली. क्लिनिकल एपिडेमिऑलॉजी, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय संशोधन आणि संशोधन क्षमतावृद्धी या क्षेत्रांत संस्थेने व्यापक कार्य केले आहे. संस्थेचे जागतिक मुख्यालय २००५ मध्ये भारतात स्थलांतरित झाले. विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाकडून वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन संस्था म्हणून मान्यता मिळालेल्या या संस्थेला २०२३ पासून भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचे सहयोगी उत्कृष्टता केंद्र म्हणूनही मान्यता मिळाली आहे.

देशभरातील २५६ हून अधिक संस्थांचे नेटवर्क असलेल्या द इंटरनॅशनल क्लिनिकल एपिडेमिऑलॉजी नेटवर्कने आतापर्यंत भारतात ७० हून अधिक मोठ्या बहुकेंद्रीय संशोधन अभ्यासांचे समन्वयन केले आहे. महाराष्ट्रातील १५ हून अधिक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसोबत संस्थेने विविध संशोधन उपक्रमांतर्गत काम केले असून, खासगी वैद्यकीय महाविद्यालयांसोबतही सहकार्याचे संबंध आहेत.

आरोग्यविषयक धोरणनिर्मितीत संशोधनाची महत्वपूर्ण भूमिका

पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे मूल्यमापन, सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम, इंजेक्शन सुरक्षितता, बालकांचे पोषण, माता व नवजात बालकांचे आरोग्य, रक्तक्षय निर्मूलन आणि कोविड-१९ महामारीतील प्रतिसाद अशा विविध विषयांवर द इंटरनॅशनल क्लिनिकल एपिडेमिऑलॉजी नेटवर्कने संशोधन केले आहे. संस्थेच्या इंजेक्शन सुरक्षिततेविषयक देशव्यापी अभ्यासातून असुरक्षित इंजेक्शन पद्धतींचे प्रमाण समोर आले. या संशोधनाच्या निष्कर्षामुळे लसीकरण सेवांमध्ये सुरक्षित इंजेक्शन पद्धतींचा अवलंब करण्यास आणि काचांच्या सिरिंजऐवजी ऑटो-डिसेबल सिरिंजचा वापर सुरू करण्यास मदत झाली. तसेच, विविध आरोग्य कार्यक्रमांच्या मूल्यमापनातून कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत आवश्यक सुधारणा करण्यासाठी महत्वपूर्ण माहिती उपलब्ध झाली आहे. नीती आयोगाच्या मार्गदर्शनाखाली पीएटीएच संस्थेसोबत भागीदारी करून २०२३-२४ या कालावधीत १५ राज्यांमधील 'ॲनिमिया मुक्त भारत' उपक्रमाचे मूल्यमापनही करण्यात आले आहे. अशा संशोधन अनुभवाचा महाराष्ट्रातील आरोग्य कार्यक्रम अधिक प्रभावी करण्यासाठी उपयोग होऊ शकणार आहे.

वैद्यकीय महाविद्यालयांमधील संशोधन क्षमता वाढविण्यावर भर

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सहकार्याने राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक, तरुण संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्याची संधी आहे. यामध्ये संशोधन पद्धती, जैवसांख्यिकी, अंमलबजावणीविषयक संशोधन, गुणात्मक संशोधन, संशोधन प्रस्ताव तयार करणे, भौगोलिक माहिती प्रणालीवर आधारित रोगशास्त्रीय अभ्यास आणि डिजिटल माध्यमांतून माहिती संकलन व डेटाबेस व्यवस्थापन यांचा समावेश होऊ शकतो. याशिवाय, वरिष्ठ प्राध्यापकांसाठी संशोधन नेतृत्व व व्यवस्थापन कार्यक्रम, विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रीय संशोधन प्रशिक्षण, संशोधन इंटर्नशिप आणि संयुक्त परिसंवाद व परिषदा आयोजित करण्याचे प्रस्तावित सहकार्याच्या क्षेत्रांत समाविष्ट आहे. पात्र संशोधकांना विद्यापीठात अतिथी किंवा संलग्न प्राध्यापक म्हणून संधी देण्याचाही विचार विद्यापीठाच्या लागू नियमांनुसार करता येऊ शकतो.

स्थानिक आरोग्यविषयक प्रश्नांवर उपाय शोधण्याची संधी

द इंटरनॅशनल क्लिनिकल एपिडेमिऑलॉजी नेटवर्कने हरियाणा, उत्तर प्रदेश आणि मेघालय या राज्यांत लोकसंख्या, विकास आणि पर्यावरणविषयक माहिती संकलित करण्यासाठी संशोधन निरीक्षण केंद्रे विकसित केली आहेत. या केंद्रांमध्ये आरोग्यविषयक माहितीसोबतच पर्यावरण, भौगोलिक परिस्थिती आणि मानवनिर्मित परिसराशी संबंधित माहितीचाही अभ्यास केला जातो. अशा बहुआयामी संशोधन पद्धतीचा उपयोग महाराष्ट्रातील स्थानिक आरोग्यविषयक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी होऊ शकणार आहे. राज्याच्या आरोग्यविषयक प्राधान्यक्रमांनुसार संशोधन प्रकल्प विकसित करणे, राष्ट्रीय स्तरावरील संशोधन निधीसाठी प्रस्ताव तयार करणे आणि वैद्यकीय महाविद्यालयांच्या सहभागातून संयुक्त संशोधन कार्यक्रम राबविणे यामुळे राज्यातील आरोग्य संशोधनाला नवी दिशा मिळू शकते.

दुष्काळाची तीव्रता गंभीर! सोलापूर जिल्ह्यात १३५ गावांना टँकरने पाणीपुरवठा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राज्यात यंदा दिवाळीच्या सणावर दुष्काळाचे सावट असून, शेतकरी पाणी आणि चाऱ्याच्या टंचाईने त्रस्त आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत जाहीर करण्यात आली आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी दुष्काळग्रस्त भागांचा




असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी स्थानिक आमदारही त्यांच्यासोबत असणार असून, तेथील परिस्थितीची सविस्तर माहिती त्यांच्याकडून घेतली जाणार आहे.

शेतकऱ्यांसमोर सध्या पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सोलापूर जिल्ह्यातील परिस्थिती सांगताना पवार म्हणाले की, जिल्ह्यातील १३९ गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. सध्या १३५ टँकरच्या माध्यमातून पाणी पोहोचवले जात आहे. तर, एकट्या माढा तालुक्यात ११० टँकर सुरू आहेत. या आकडेवारीवरून दुष्काळाची तीव्रता लक्षात येते, असेही त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या अडचणी समजून घेण्यावर आपण भर देणार असल्याचे पवार यांनी सांगितले. नागरिकांना आणि शेतकऱ्यांना ज्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्या उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. यासंदर्भात राज्य सरकारकडेही मदतीची मागणी करणार असून, सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मार्ग काढण्याबाबत आपण यापूर्वीच दिल्लीत तसेच मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेतली असल्याची माहितीही पवार यांनी दिली. या चर्चेतून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी निश्चितच काहीतरी मार्ग निघेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, दुष्काळी दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी दिल्लीतील इंडिया आघाडीचे आंदोलन, राज्यातील दुष्काळी परिस्थिती, सरकारची भूमिका आणि उजनी परिसरातील एआय डेटा सेंटर या विषयांवरही माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली.

मंद्रूप, जुळे सोलापूर बसस्थानकांच्या कामांना गती

प्रताप सरनाईक यांचे निर्देश



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- दक्षिण सोलापूर मतदारसंघातील मंद्रूप आणि जुळे सोलापूर येथील नवीन एसटी बसस्थानकांच्या उभारणीला आता गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रतापराव सरनाईक यांनी या दोन्ही प्रकल्पांकडे विशेष लक्ष देत आवश्यक प्रशासकीय कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

आमदार सुभाष देशमुख यांनी परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांची सदिच्छा भेट घेऊन दोन्ही बसस्थानकांच्या प्रस्तावांना मंजुरी मिळवून देण्यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले. यावेळी दोन्ही प्रकल्पांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला.

मंद्रूप येथे ग्रामीण भागातील प्रवासी, विद्यार्थी, महिला, नोकरदार आणि ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी नवीन बसस्थानक उभारण्याचा आमदार सुभाष देशमुख यांचा प्रयत्न आहे. यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव तसेच एसटी महामंडळाच्या संचालक मंडळाच्या ठरावासंदर्भातील कार्यवाही महत्त्वपूर्ण टप्प्यावर आहे.

दुसरीकडे, जुळे सोलापूर परिसरातील वाढते नागरीकरण आणि प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन विजापूर रोड येथे एक हेक्टर जागेवर नवीन एसटी बसस्थानक उभारण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावालाही एसटी महामंडळाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

या दोन्ही प्रकल्पांचे महत्त्व लक्षात घेऊन मंत्री प्रतापराव सरनाईक यांनी स्वतः जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधत बसस्थानकांच्या कामकाजाकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना केल्या. तसेच आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश देतानाच एसटी महामंडळाच्या स्तरावर सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

मंद्रूप आणि जुळे सोलापूर येथील नवीन बसस्थानकांची उभारणी झाल्यास ग्रामीण आणि शहरी भागातील प्रवाशांची मोठी गैरसोय दूर होणार आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बळकटी मिळण्यासोबतच या परिसराच्या विकासालाही चालना मिळणार आहे. आमदार सुभाष देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे दोन्ही प्रकल्पांच्या प्रत्यक्ष कामांना लवकरच गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.
मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर
संपर्क - 9422602337, 8317212037

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल
सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666


(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरुपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू

जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) शहर २) पैसे लावून खेळला जाणारा सट्ट्याचा खेळ ३) दृष्टी ४) मनातील विचार ५) एक म्हण-गाव करील ते ** काय करील ६) पटकन, त्वरेने ८) सातारा जिल्ह्यातील एक तालुका ९) मंत्री महोदयांच्या नावापुढे येणारे विशेषण ११) जेवल्यानंतर मुखशुध्दीसाठी ही खातात १४) श्वसनेंद्रिय १५) श्रीगणेशाची मंगळवारी येणारी चतुर्थी १६) देवाचे सततचे केलेले नामस्मरण १८) रायगडचे खासदार - सुनील **** १९) फॅक्टरी (मराठीत) २०) माफ करणे २१) स्व. आर.आर.पाटील यांचा विधानसभा मतदारसंघ २३) पंधरा दुणे २५) लग्नमंडपातील वधू मुलगी २७) सोने चांदीचे दागिने विक्री करणारा २९) समुद्र, रत्नाकर, मुलाचे एक नाव ३०) पाठीच्या कण्याचे शेवटचे टोक हाडाच्या या भागाला जोडले जाते ३२)श्रीगणेशाचे एक नाव ३४) महाराष्ट्रातील एक जिल्हा ३६) टेकडी (हिंदीत) ३८) वय उलट लिहा ४१) मुंबईतील या भागात दूरदर्शनचे मुख्य केंद्र आहे ४२) दरवाजा ४४) मग्न, लीन ४६) चेष्टा मस्करी करणे, ** उडविणे

आडवे शब्द : १) दशरथ मांझी यांची भूमिका करणारा हिंदी चित्रपटातील अभिनेता-***** सिद्दीकी ४) सोलापूर जिल्ह्यातील एक तालुका, ढामा उलट लिहा ५) या लढाऊ विमान खरेदीवरून भाजपवर आरोप झाले होते ७) जय *** जय किसान ९) एक म्हण-** मोठे लक्षण खोटे १०) ताणला जाणारा लवचिक पदार्थ १२) श्रीमंत (हिंदीत) १३) छ. शिवरायांचा एक सरदार- येसाजी ** १५) एखाद्या गोष्टीविषयी व्यक्त केलेले अनुमान १७) शेकाप पक्ष संपूर्ण शब्दात लिहा २१) रागीट, लगेच क्रोध येणारा २२) एक म्हण- अति तेथे ** २४) मित्र, सोबती २६) शर्यत (इंग्रजीत), सैफ अली खान अभिनीत एक चित्रपट २८) अंतराळ संशोधन करणारी अमेरिकेतील प्रख्यात संस्था ३०) आईची बहीण ३१) तमाशातील नाट्यप्रकार ३३) मनसे अध्यक्षांचे फक्त नाव ३५) भाजपचे केंद्रीय मंत्री-नितीन **** ३७) आयुर्वेदिक औषधांमध्ये वापरतात ते एक प्रकारचे फळ ३९) पुष्कळ, भरमसाठ ४०) एक म्हण-मनी नाही भाव अन् देवा मला ** ४२) राक्षस ४३) थंड, शीत ४५) विहिरीतून पाणी खेचण्याचे चक्राकार साधन ४७) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ४८) पतीची दुसरी बायको ४९) वाघ सिंहाचे जोराचे ओरडणे

सुडोकु - 90

		4	3					1
		7		9	1	2	4	
1	9			4		8		
7		9	2			5		6
		2		5			3	
				7	6	9	1	2
4		5		8				
2	7					1	5	8
			6	2	5	3	7	

सापटणेच्या तळ्यात पाणी न सोडल्यास आजी-माजी आमदारांच्या दारात जाऊन शेतकरी करणार 'पहिली आंघोळ'!

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- उजनी धरण १०० टक्के भरलेले असतानाही सापटणे, वेणगाव व तांबवे परिसरातील शेतकऱ्यांना हक्काचे पाणी मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा संताप आता शिगेला पोहोचला आहे. पाणी मिळेपर्यंत आमरण उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार केलेल्या शेतकऱ्यांनी आता थेट राजकीय नेत्यांच्या दारात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. सापटणेच्या तळ्यात पाणी सोडले नाही, तर दिवाळीच्या पहिल्या आंघोळीच्या दिवशी माढ्याचे विद्यमान आमदार अभिजित आबा पाटील तसेच माजी आमदार बबनदादा शिंदे यांच्या निवासस्थानासमोर जाऊन पहिली आंघोळ करून आंदोलन करणार असल्याचा इशारा उपोषणकर्त्या शेतकऱ्यांनी दिला आहे. या अनोख्या आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे माढा तालुक्यातील राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

माढा तालुक्यातील सापटणे, वेणगाव आणि तांबवे येथील शेतकऱ्यांना उजनी कालव्याचे पाणी मिळावे, या मागणीसाठी दहा शेतकऱ्यांनी सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ पासून टेंभुर्णी येथील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. आज या उपोषणाचा तिसरा दिवस असून,



अद्यापही संबंधित प्रशासनाचा कोणताही अधिकारी आंदोलनस्थळी पोहोचला नसल्याची खंत उपोषणकर्त्यांनी व्यक्त केली आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी परिसरातील सुमारे ३०० शेतकरी दररोज उपस्थित राहणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, सापटणे, वेणगाव व तांबवे येथील शेतकऱ्यांसाठी कालव्याद्वारे पाणी सुरू करण्यात आले होते. मात्र, सापटणे गावासाठी केवळ तीन दिवस पाणी सोडण्यात आले. त्यानंतर गावाचा पाणीपुरवठा बंद करून इतर गावांना पाणी सुरू ठेवण्यात आले. उजनी धरण १०० टक्के भरलेले असताना स्थानिक शेतकऱ्यांची मागणी केवळ ५० टक्के पाण्याची असतानाही त्यांना पाणी मिळत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

सध्या परिसरात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, पिकांना पाणी मिळत नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. पाणी उपलब्ध न झाल्यास शेतीचे नुकसान होऊन शेतकऱ्यांवर स्थलांतराची वेळ येण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

या प्रश्नासंदर्भात शेतकऱ्यांनी दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी पाटबंधारे विभागाला लेखी निवेदन दिले होते. मात्र, निवेदन देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याने शेतकऱ्यांनी आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला.

या आंदोलनाला तीन दिवस उलटूनही माढा तालुक्याचे विद्यमान आमदार अभिजित पाटील यांनी कोणतीही दखल घेतली नसल्याची नाराजी उपोषणकर्त्यांनी व्यक्त केली. तसेच माजी आमदार बबनदादा शिंदे आणि रणजितसिंह शिंदे यांनीही अद्याप आंदोलनाची दखल घेतली नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. प्रशासनातील कोणताही अधिकारी आमच्यापर्यंत पोहोचलेला नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

दिवाळीच्या पहिल्या आंघोळीच्या दिवशीही आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आम्ही थेट आमदार अभिजित आबा पाटील यांच्या निवासस्थानासमोर जाऊन पहिली आंघोळ करून आंदोलन करू. तसेच माजी आमदार बबनदादा शिंदे यांच्या घरासमोरही जाऊन पहिली आंघोळ करून तेथेच शेतकरी ठिय्या मांडतील, असा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे. आमच्या पाण्याच्या प्रश्नाकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष द्यावे, अन्यथा आंदोलनाची तीव्रता वाढवली जाईल, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे.

हे दहा शेतकरी आमरण उपोषणाला

या आंदोलनात पांडुरंग मकरध्वज ढवळे, प्रशांत बाबाजी जगताप, सुनील भजनदास पाटील, जितेंद्र जोतिराम ढवळे, हेमंत भजनदास पाटील, मोहन भजनदास ढवळे, अक्षय विश्वास ढवळे, लहू भजनदास ढवळे, मारुती सदाशिव कुबेर आणि नागनाथ महादेव क्षीरसागर हे दहा शेतकरी आमरण उपोषणाला बसले आहेत.

उपोषणासाठी मंडप उभारण्याकरिता जागा उपलब्ध करून द्यावी व आवश्यक सहकार्य करावे, अशी मागणी पाटबंधारे विभागाकडे करण्यात आली आहे. उपोषणकर्त्यांच्या जीवितास काही बरेवाईट झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पाटबंधारे विभाग व प्रशासनाची राहील, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

धरण भरले, निमगाव तिचे तळे भरले पण सापणे टें चे तळे कधी भरणार शेतकऱ्यांच्या डोळ्यात आले पाणी मग तळ्यात पाणी कधी?

उजनी धरणात मुबलक पाणीसाठा असतानाही निमगाव टें तळे भरले असताना आमच्या सापटणे टें तळ्यात पाणी सोडण्याची वाट पाहून आमच्या डोळ्यात पाणी येऊ लागले आहे या परिसरातील शेतकऱ्यांना पाण्यासाठी आंदोलन करावे लागत असल्याने पाणीवाटपाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. शेतकऱ्यांच्या या प्रश्नाची लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने तातडीने दखल घेऊन सापटणे, वेणगाव व तांबवे परिसरातील पाणीपुरवठा पूर्ववत करावा, अशी मागणी होत आहे. आता शेतकऱ्यांच्या या आंदोलनाची प्रशासन आणि आजी-माजी लोकप्रतिनिधी किती गांभीर्याने दखल घेतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

विवाहितेवर दुष्कर्म केल्याप्रकरणी भालगावच्या इसमाची निर्दोष मुक्तता - ॲड मिलिंद थोबडे

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- विवाहितेवर दुष्कर्म केल्याप्रकरणी नागनाथ सुखदेव दराडे, वय 47 रा. भालगाव, तालुका बार्शी जिल्हा सोलापूर याचेवर भरलेल्या खटल्यात बार्शी येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश एल.एस. रोटे यांनी निर्दोष मुक्तता केली.

या हकीकत अशी की, पीडित महिलाही तिच्या पतीसोबत राहत होती. तिच्या पतीस आरोपी हा दारू पिण्यासाठी पैसे देत होता. त्यानंतर ते दोघे घरातच दारू पीत बसत होते. एके दिवशी पीडिता घरात एकटीच असताना आरोपीने तिचे इच्छे विरुद्ध दुष्कर्म केले. त्यानंतर तो तिस फोन करून तिच्या पतीस



जीवे ठार मारण्याची धमकी देऊन तिचे इच्छे विरुद्ध दुष्कर्म करायचा, अशा आशयाची फिर्याद पिडितेने वैराग पोलिस ठाण्यात दिली होती.

सदर गुन्ह्याचा तपास करून पोलिसांनी आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोप पत्रक दाखल केले होते.

खटल्याच्या सुनावणीच्या वेळी आरोपीचे वकील ॲड.मिलिंद थोबडे यांनी आपले युक्तिवादात, पोलिसांनी पीडिता व आरोपी यांच्या मोबाईल वरील संभाषणाचे सीडीआर रिपोर्ट नुसार पीडीता व आरोपी हे दिवसातून दोन ते तीन वेळा फोनवर बोलत असल्याचे दिसून येते. तसेच सरकार पक्षाने मेडिकल रिपोर्ट न्यायालयासमोर आणलेला नाही. त्यामुळे आरोपीने दुष्कर्म केले असे म्हणता येणार नाही, असा युक्तिवाद मांडला त्यावरून न्यायाधीशांनी आरोपीची निर्देश मुक्तता केली.

या आरोपी तर्फे ॲड मिलिंद थोबडे, ॲड निखील पाटील तर सरकारतर्फे ॲड एस. इ. होटकर यांनी काम पाहिले.

सोलापूरला ५ नोव्हेंबरला 'आरोग्य संवाद यात्रा'

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्यासाठी सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या पुढाकारातून राज्यव्यापी 'आरोग्य संवाद यात्रा' आयोजित करण्यात येत आहे.

१ नोव्हेंबरला नांदेड येथून आरोग्यमंत्री यांच्या उपस्थितीत शुभारंभ झालेली ही यात्रा ५ डिसेंबर २०२६ पर्यंत चालणार आहे. या यात्रेचा सोलापूर जिल्हा टप्पा दिनांक ५ नोव्हेंबर २०२६ रोजी होणार असून, सोलापूर येथे आरोग्य संवाद यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

या यात्रेच्या माध्यमातून आरोग्यमंत्री थेट जनतेशी संवाद साधणार असून, राज्यातील आरोग्यसेवांचा आढावा घेऊन त्यातील त्रुटी दूर करण्यावर भर दिला जाणार आहे.

नागरिकांच्या गरजा समजून घेणे, आरोग्य सेवांमधील त्रुटी ओळखणे आणि प्राप्त सूचनांच्या आधारे सुधारणा घडवून आणणे, हा या यात्रेचा मुख्य उद्देश आहे.

'माझे गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाशी सांगड

'माझे गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाशी यात्रेची सांगड घालून सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, पोषण, सांडपाणी व्यवस्थापन, आजारांचे नियंत्रण आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जनजागृती केली जाणार आहे. प्रतिबंधात्मक आरोग्य उपायांमध्ये ग्रामपातळीवरील सहभाग वाढविण्यावरही भर राहणार आहे.

जनतेच्या सूचनांवरून आरोग्य



सेवेत सुधारणा - आरोग्य संवाद यात्रा ही केवळ आरोग्य योजनांची माहिती देणारी मोहीम राहणार नसून, नागरिकांच्या अनुभवातून आरोग्य व्यवस्थेतील सुधारणा निश्चित करण्याचा प्रयत्न आहे.

सेवांचा प्रत्यक्ष आढावा

आरोग्य योजनांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांपर्यंत किती प्रमाणात पोहोचतो, आरोग्य संस्थांमध्ये कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत आणि रुग्णसेवेत कोणत्या अडचणी येतात, याचा आढावा यात्रेत घेतला जाणार आहे.

प्रत्येक जिल्ह्यातील पाच प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि दोन ग्रामीण रुग्णालयांच्या कामकाजाची वस्तुस्थिती जाणून घेतली जाणार आहे. आरोग्य उपकेंद्रापासून जिल्हा, महानगरपालिका, स्त्री मनोरुग्ण आणि विशेष रुग्णालयांपर्यंतच्या सेवांचाही आढावा घेतला जाणार आहे.

महात्मा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री आयुष्यमान भारत जनआरोग्य योजनेत अंगीकृत रुग्णालयांना भेट देऊन खासगी डॉक्टर व रुग्णांशी संवाद साधला जाणार आहे. पॅलिएटिव्ह केअर, सिकलसेल, संस्थात्मक प्रसूती झालेल्या माता, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत शस्त्रक्रिया झालेली बालके, क्षयरोग, कुष्ठरोग, जननी सुरक्षा योजना लाभार्थी, कर्करोग तपासणीतील रुग्ण, महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ घेतलेले रुग्ण यांच्याशी संवाद साधण्यात येईल.

यात्रेची ठळक वैशिष्ट्ये

या आरोग्य संवाद यात्रेत १२५ नवीन संस्थांचे लोकार्पण करण्यात येणार आहे. सोबतच जिल्हा एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती, विधानसभा मतदारसंघ समिती, रुग्ण कल्याण समिती, जन आरोग्य समिती, ग्राम आरोग्य, पोषण स्वच्छता समिती यापैकी एका समितीसोबत बैठक व चर्चा करण्यात येईल. शासकीय आरोग्य संस्थांच्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी व आढावा घेण्यात येईल. राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत तपासणी करण्यात आलेल्या शाळा व अंगणवाडींना भेट देऊन या योजनेचा आढावा घेतला जाईल.

या यात्रेत सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव, आयुक्त, संचालक, सहसंचालक, उपसंचालक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक आणि विविध आरोग्य योजनांचे प्रमुख अधिकारी सहभागी होणार आहेत. तरी सोलापूरकरांनी या यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आरोग्य विभाग, सोलापूर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

उजनीवरील AI डेटा सेंटर प्रकल्पाला शेतकऱ्यांचा घेरावातून विरोध

करमाळा (कटूसत्य वृत्त):- उजनी धरण परिसरात प्रस्तावित असलेल्या AI डेटा सेंटर प्रकल्पावरून शेतकरी आणि प्रशासन यांच्यात महत्त्वपूर्ण चर्चा झाली. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन हे उजनी धरणावर आले असता शेतकऱ्यांनी त्यांना घेराव घालत प्रस्तावित AI डेटा सेंटर प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शविला. यावेळी शेतकऱ्यांच्या भावना आणि आक्षेप ऐकून घेत जिल्हाधिकाऱ्यांनी महत्त्वपूर्ण आश्वासने दिली. तसेच ग्रीन हायड्रोजन आणि अणुऊर्जा प्रकल्प रद्द करण्यात आल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

उजनी धरण हे सोलापूर जिल्ह्यासह परिसरातील हजारो शेतकऱ्यांच्या शेती आणि पिण्याच्या पाण्याचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे धरण परिसरात प्रस्तावित असलेल्या AI डेटा सेंटर प्रकल्पामुळे भविष्यात शेती, पाणी आणि स्थानिक



नागरिकांच्या हितावर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन उजनी धरणावर आले असता शेतकऱ्यांनी त्यांना घेराव घालून प्रकल्पाबाबत आपला विरोध स्पष्ट केला.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त करताना, "तुमची एक गुंठा सुद्धा जमीन घेणार नाही आणि तुमचं एक थेंब सुद्धा पाणी घेणार नाही," अशी स्पष्ट भूमिका मांडली. तसेच या प्रकल्पाबाबत आधी संपूर्ण माहिती जाणून घ्या, प्रत्येक गोष्ट तुम्हाला समजावून सांगतो, त्यानंतर तुम्ही निर्णय घ्या, असेही त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले.

"मी माझ्या टीमसोबत येतो. दिवाळीनंतर या विषयावर आपण बैठक ठेवूया. AI प्रकल्प नेमका काय आहे, त्याचे स्वरूप काय आहे, याची सविस्तर माहिती तुम्हाला समजावून सांगतो. त्यानंतर तुम्ही तुमचा निर्णय घ्या. तुमच्या मनाविरुद्ध तिथे एक वीटसुद्धा लावली जाणार नाही," अशा शब्दांत जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले.

दरम्यान, याच चर्चेदरम्यान जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आणखी एक महत्त्वाची माहिती दिली. उजनी धरण परिसरातील प्रस्तावित ग्रीन हायड्रोजन प्रकल्प आणि अणुऊर्जा प्रकल्प रद्द करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे या दोन्ही प्रकल्पांबाबत व्यक्त होत असलेल्या शेतकऱ्यांच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर ही माहिती महत्त्वाची मानली जात आहे.

AI डेटा सेंटर प्रकल्पाबाबत मात्र प्रशासनाकडून दिवाळीनंतर शेतकऱ्यांसोबत स्वतंत्र बैठक घेऊन सविस्तर माहिती दिली जाणार आहे. या बैठकीत प्रकल्पाचे स्वरूप, त्यासाठी लागणारी जमीन, पाण्याची आवश्यकता आणि स्थानिक शेतकऱ्यांवर होणारे संभाव्य परिणाम याबाबत स्पष्टता येण्याची अपेक्षा आहे.

उजनी धरणावरील प्रस्तावित प्रकल्पांविरोधात शेतकरी, मच्छीमार, शेतमजूर आणि स्थानिक नागरिकांकडून विरोध व्यक्त केला जात आहे. अशा परिस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांनी थेट शेतकऱ्यांशी संवाद साधत दिलेली आश्वासने आणि ग्रीन हायड्रोजन व अणुऊर्जा प्रकल्प रद्द झाल्याची दिलेली माहिती यामुळे या विषयाला नवे वळण मिळाले आहे.

आता दिवाळीनंतर होणाऱ्या बैठकीत जिल्हाधिकारी आणि त्यांची टीम शेतकऱ्यांना AI डेटा सेंटर प्रकल्पाबाबत नेमकी काय माहिती देते आणि त्यानंतर शेतकऱ्यांची भूमिका काय राहते, याकडे उजनी परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

गरजू, अंध व निराधारांना प्रत्यक्ष मदत करणे हीच खरी ईश्वरसेवा - अशोकशेठ लुणावत

साई सेल्स कार्पोरेशनच्या माध्यमातून वाढदिवसानिमित्त 150 जणांना अन्नदान

माढा (कटूसत्य वृत्त):- समाजातील गोरगरीब, गरजू,अंध व निराधार लोकांना वेळोवेळी प्रत्यक्ष मदत व सहकार्य करणे हीच खरी ईश्वरसेवा आहे ही माजी आमदार बबनराव शिंदे यांची शिकवण आहे.त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून माझी वाटचाल सुरू आहे. वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च करण्यापेक्षा जे लोक समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. ज्यांना अन्नाची,मदतीची व आधाराची गरज आहे अशा आश्रमातील वयोवृध्द लोकांना व अंध विद्यार्थ्यांना अन्नदान करुन त्यांच्यासमवेत काही वेळ व्यतीत केल्याने खरे आत्मिक समाधान लाभल्याचे प्रतिपादन साई सेल्स कॉर्पोरेशनचे सर्वेसर्वा अशोक लुणावत यांनी केले.

ते साई सेल्स कार्पोरेशन माढा यांच्या वतीने 1 नोव्हेंबर रोजीच्या 65 व्या वाढदिवसानिमित्त पंढरपूर येथील शहीद मेजर कुणाल गोस्वामी निवासी अंधशाळा व श्री संत तनपुरे महाराज मातोश्री वृद्धाश्रमातील सुमारे 150 जणांना अन्नदान करताना बोलत होते.

प्रास्ताविक वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक धनंजय राक्षे यांनी केले.

यावेळी मातोश्री वृद्धाश्रमाचे अध्यक्ष हभप बद्रीनाथ तनपुरे,सचिव हभप अनंत तनपुरे व सदस्या डॉ. शुभांगी तनपुरे यांनी साई सेल्स कॉर्पोरेशनचे सर्वेसर्वा अशोक लुणावत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन त्यांना निरोगी दीर्घायुष्य





लाभावे म्हणून पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना केली.मातोश्री वृद्धाश्रमातील महिलांनी अशोक लुणावत यांचे औक्षण करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी वृद्धाश्रमातील पुरुष व महिलांनी सलग 5 व्या वर्षी वाढदिवसानिमित्त अन्नदान केल्याबद्दल अशोक लुणावत यांचे आभार मानले.

यावेळी विठ्ठलवाडीचे आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड सर यांनी सांगितले की, गोरगरीब, गरजू व अंध विद्यार्थ्यांना वाढदिवसानिमित्त अन्नदान करणे म्हणजे खूप मोठे सत्कृत्य आहे. अनेक लोक वाढदिवसाच्या निमित्ताने अनावश्यक खर्च करून मोठा गाजावाजा व डामडौल करतात.ही वस्तुस्थिती असताना आजही समाजात अशोक लुणावत यांच्यासारखे दानशूर लोक तळागाळातील समाजाप्रती आस्था व आपुलकी जपणारे आहेत असे सांगून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

"अशोकशेठ लुणावत यांच्यावर वाढदिनी शुभेच्छांचा वर्षाव"- बँकीग, सामाजिक,सांस्कृतिक व उद्योजकतेच्या क्षेत्रात प्रामाणिक कष्टातून नावलौकिक प्रस्थापित केलेले अशोक लुणावत यांच्या 1 नोव्हेंबर रोजीच्या 65 व्या वाढदिवसानिमित्त दूरध्वनी, सोशल मीडियाच्या माध्यमातून व प्रत्यक्ष भेटून दिवसभर अक्षरशः शुभेच्छांचा वर्षाव झाला. यामध्ये माजी आमदार बबनराव शिंदे,जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, प्रा.शिवाजीराव सावंत, विक्रमसिंह शिंदे, जेष्ठ विधीतज्ञ धनंजय माने, डॉ.बी.वाय यादव,डॉ.विराज भंडारी, डॉ.एकनाथ शेळके, व्यवस्थापक सुधीर मोरे, पोलीस निरीक्षक अतुल मोहिते, सपोनि रोहित शिंदे, अजितसिंह देशमुख, प्रा.डॉ.गोरख देशमुख, नगरसेवक राजू गोटे, शहाजी साठे, सरपंच अशोक शिंदे, शाखाधिकारी अनिलकुमार अनभुले, संचालक शिवाजी बारबोले, माजी सरपंच शिवाजी भोगे यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांचा समावेश आहे.

अशोकशेठ लुणावत यांच्या 65 व्या वाढदिवसानिमित्त सकाळी घरी त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.मंगल लुणावत यांनी औक्षण करून निरोगी दीर्घायुष्य लाभावे म्हणून ईश्वरचरणी प्रार्थना केली. यावेळी इंजिनिअर अभिजित लुणावत,विपुला लुणावत, प्रिशा लुणावत, विआंश लुणावत उपस्थित होते.

यावेळी अंजनगाव उमाटेचे माजी सरपंच गणेश काशीद, विकास अधिकारी अशोक कवाडे, अंधशाळेचे अध्यक्ष मुन्नागिर गोसावी, शाखाधिकारी जयंत खुर्द, डॉ.विवेक गुंडेकर, संतोष बाराहाले, नारायण दिघे, रोहिणी घोडके, नितीन कदम, सुनील व्यवहारे, आकाश घाडगे, प्रदिप शिंगटे, सिद्धेश्वर नवले यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

गोवा बनावटीच्या मद्याची वाहतूक करणारे वाहन पकडले

३०.९१ लाखांचा मुद्देमाल जप्त

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- गोवा राज्यात निर्मित विदेशी मद्य आणि बिअरची बेकायदा वाहतूक करणाऱ्या वाहनावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने इचगाव टोलनाक्यावर धडक कारवाई केली. या कारवाईत २३८ बॉक्समधील विदेशी मद्याच्या ३ हजार ८८८ बाटल्या, बिअरच्या २६४ बाटल्या आणि टाटा कंपनीचे इंट्रा वाहन असा एकूण ३० लाख ९१ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी एक गुन्हा दाखल करून दोघांवर कारवाई करण्यात आली.

३१ ऑक्टोबर रोजी मिरज-सोलापूर महामार्गावरील इचगाव



टोलनाका, ता. मोहोळ येथे ही कारवाई करण्यात आली. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख आणि पुणे विभागाचे विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांच्या निर्देशानुसार, अध्यक्ष भाग्यश्री जाधव आणि उपअधीक्षक सौरभ अदाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

जप्त केलेल्या मुद्देमालात ७५० मिली व १८० मिली क्षमतेच्या विदेशी मद्याच्या ३ हजार ८८८ बाटल्या, तसेच बिअरच्या २६४ बाटल्यांचा समावेश आहे. यामध्ये २ हजार ६८ ब. ली. विदेशी मद्य आणि १३२ ब. ली. बिअर जप्त करण्यात आली.

सात महिन्यांत १० कोटींचा मुद्देमाल जप्त

दरम्यान, १ एप्रिल ते ३१ ऑक्टोबर २०२६ या सात महिन्यांच्या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने सोलापूर शहर व जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतुकीविरोधात मोठी मोहीम राबविली. या कालावधीत एकूण १ हजार ८२५ गुन्हे दाखल करण्यात आले असून, १ हजार ९२५ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

या मोहिमेत ६ लाख ७२ हजार ८६६ लिटर रसायन, ४८ हजार ६९२.५ लिटर हातभट्टी दारू, ९ हजार ३३८.१७ लिटर परराज्यातील मद्य व बिअर, १० हजार ६५८.८ ब. ली. ताडी, ३ लाख ३१ हजार ४९० रिकाम्या बाटल्या, १ लाख ३३ हजार १६० बनावट बुचे, १ लाख ५५ हजार ४०० बनावट लेबल आणि १३ हजार ८०० लिटर स्पिरीट जप्त करण्यात आले.

याशिवाय १८२ वाहने जप्त करण्यात आली असून, वाहनांसह एकूण १० कोटी २२ लाख ९७ हजार ५५५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

जागा मालकांवरही कारवाईचा बडगा

अवैध ढाब्यांवर मद्यविक्री करणे, बेकायदा मद्यनिर्मिती, वाहतूक आणि मद्याचा साठा करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जागांच्या मालकांनाही या कारवाईत आरोपी करण्यात आले आहे. त्यामुळे अवैध मद्यव्यवसायाला जागा उपलब्ध करून देणाऱ्यांवरही विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे.

या मोहिमेत राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक जे. एन. पाटील, दुय्यम निरीक्षक राम निंबाळकर, समाधान शेळके, जवान अनिल पांढरे, चेतन व्हनगुंटी, प्रशांत इंगोले, मंगेश मारसिंग आणि स्वप्नील यरमाळ यांनी परिश्रम घेतले.

विषारी बनावट दारूपासून सावध राहण्याचे आवाहन

पुणे येथे मिथेनॉलयुक्त बनावट दारूमुळे झालेल्या दुर्घटनेत काही नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. विषारी दारूच्या सेवनामुळे किडनी निकामी होणे, कायमस्वरूपी अंधत्व येणे तसेच अकाली मृत्यू होण्यासारखे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांनी स्वस्त मद्याच्या आमिषाला बळी पडू नये, अनधिकृत ठिकाणांहून मद्य खरेदी करू नये आणि अवैध मद्याबाबतची माहिती विभागाला द्यावी, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाने केले आहे.

श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलचे क्रीडा स्पर्धांमध्ये घवघवीत यश

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर महानगरपालिका आणि सोलापूर जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या शहरस्तरीय विविध क्रीडा स्पर्धांमध्ये श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. फेन्सिंग, वेटलिफ्टिंग, मैदानी स्पर्धा, जलतरण, तलवारबाजी, कुस्ती, कराटे आणि बॉल बॅडमिंटन अशा विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई केली. विशेष म्हणजे यशस्वी विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावरील स्पर्धांसाठी निवड झाली आहे.

शहरस्तरीय फेन्सिंग स्पर्धेत गौरी पाटील हिने सुवर्णपदक पटकावले. वेटलिफ्टिंग स्पर्धेत पवित्रा बिराजदार, श्रद्धा चव्हाण आणि प्रांजल शिंदे यांनी रौप्यपदक मिळवले. मैदानी स्पर्धामध्ये प्रिशियस होराम हिने १०० मीटर धावणे आणि लांब उडी या दोन्ही प्रकारांत सुवर्णपदक मिळवले, तर



यारसोमी होराम हिने गोळाफेकमध्ये सुवर्णपदक पटकावले. अपंबा लोयतोंगबम हिने लांब उडीत कांस्यपदक मिळवले. बॉल बॅडमिंटन स्पर्धेत शाळेच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवला.

जलतरण स्पर्धेत अपंबा लोयतोंगबम हिने ५० मीटर बटरफ्लाय, १०० मीटर बटरफ्लाय आणि २०० मीटर आय.एम. या तिन्ही प्रकारांत सुवर्णपदकांची हॅट्रिक केली. होनसो आवगशांतसंग हिने याच तिन्ही प्रकारांत रौप्यपदके मिळवली. आरहन कालखान याने ५० व १०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये कांस्य, तर २०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये रौप्यपदक पटकावले.

तलवारबाजी स्पर्धेत हर्षवर्धन नवले याने सुवर्णपदक, विजय नवले याने रौप्यपदक, तर प्रणव नरळे आणि विजय लोणारी यांनी कांस्यपदके मिळवली. कुस्ती स्पर्धेत श्रद्धा चव्हाण आणि रुचा उंदळे यांनी सुवर्णपदके, तर भक्ती चव्हाण आणि थेंमजण होराम यांनी रौप्यपदके पटकावली. कराटे स्पर्धेत तन्मय बाहेरवाडे याने सुवर्णपदक, तर रुद्र जाधव याने रौप्यपदक मिळवून शाळेच्या यशात भर घातली.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण संकुलाचे चेअरमन धर्मराज काडादी, सिद्धेश्वर शिक्षण समितीचे पालक विश्वस्त विलास कारभारी, ड. रेवणसिद्ध पाटील, गुरुराज माळगे, राजशेखर येळीकर, पशुपतिनाथ माशाळ, प्रभुराज मैंदर्गीकर आणि भीमाशंकर पटणे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शाळेच्या मुख्याध्यापिका प्रीती दुलंगे, पर्यवेक्षिका नीता तमशेट्टी आणि ज्येष्ठ शिक्षिका अरोरा यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक सीताराम भांड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेची साक्ष देणारे असून, विभागीय स्तरावरही विद्यार्थी अशीच चमकदार कामगिरी करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.